# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S.(ठाणे):** विजापुर नाका **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0183 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 19/04/2022 02:17 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनांक पासून):** 18/04/2022
**Date To ( दिनांक पर्यंत):** 18/04/2022
**Time From (वेळेपासून):** 15:08 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:57 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 19/04/2022 **Time (वेळ):** 01:50 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 003 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/04/2022 02:17 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 3 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** विद्युत निरीक्षण विभाग, उद्योग,उर्जा व कामगार खाते कार्यालयात,स्वताच्या कक्षामध्ये सोलापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शरद बाबु मिसाळ

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1963 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मु पो वेळापुर शेरी,ता माळशिरस, जि सोलापूर,विजापुर नाका,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मु पो वेळापुर शेरी,ता माळशिरस, जि सोलापूर,विजापुर नाका,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | फैजुलअली मेहबुब मुल्ला | | | 1. प्लट नं 34, अंत्रोळीकर नगर,अननुर बंगला, सोलापूर,विजापुर नाका,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दि. 19.04.2022 मी शरद बाबु मिसाळ, वय 59 वर्षे, व्यवसाय - सेवानिवृत्त सहा. अभियंता, महावितरण कार्यालय, अकलुज विभाग, सोलापूर रा. मु. पो. वेळापुर शेरी, ता. माळशिरस, जि. सोलापूर, मो. क्रं. 9970816000, समक्ष फिर्यादी जबाब देतो की, मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासह राहणेस असुन दि. 31/05/2021 रोजी महावितरण पिलीव शाखा कार्यालय, अकलुज विभाग, सोलापूर येथुन सेवानिवृत्त झालो आहे. मी सेवानिवृत्तीनंतर खाजगी कन्ट्रक्ट पध्दतीने इलेक्ट्रीकची कामे घेण्याकरीता वेळापुर शेरी येथे मिसाळ इंडस्ट्रीज, सोलापूर या नावाने नविन फर्म सुरु करण्याचे ठरविले. सदर फर्म सुरु करण्याकरीता विद्युत ठेकेदार परवान्याची आवश्यकता असते व विद्युत ठेकेदार परवान्यासाठी विद्युत पर्यवेक्षक परवाना आवश्यक आहे. त्याकरीता मी विद्युत निरीक्षक, सोलापूर यांचेकडे अर्ज करुन प्रथम विद्युत पर्यवेक्षक परवाना दि. 11/01/2022 रोजी प्राप्त केला. त्यानंतर दि. 07/03/2022 रोजी नविन इलेक्ट्रीकल कन्ट्रक्टर लायसेन्स मिळणेकरीता योग्य त्या कागदपत्रांसह अर्ज सादर केला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने मी दि. 24/03/2022 रोजी विद्युत निरीक्षण विभाग कार्यालय, सोलापूर येथे जावुन मा. सहा. विद्युत निरीक्षक, श्री मुल्ला यांना भेटलो असता त्यांनी मला दि. 07/04/2022 रोजी विद्युत निरीक्षण विभाग कार्यालय, सोलापूर येथे येण्यास सांगीतले. त्यानुसार मी दि. 07/04/2022 रोजी पुन्हा सदर कार्यालयात गेलो परंतु मुल्ला साहेब कार्यालयात नसल्याने त्यांची व माझी त्यांची भेट झाली नाही. त्यानंतर मी दि. 12/04/2022 रोजी पुन्हा सदर कार्यालयात गेलो असता मुल्ला साहेब यांच्या कक्षामध्ये मी त्यांना भेटुन मला नविन इलेक्ट्रीकल कन्ट्रक्टर लायसेन्स मिळणेबाबत विनंती केली असता त्यांनी माझे कागदपत्रे पाहुन त्यामध्ये काही त्रुटी असल्याचे सांगीतले. त्यावेळी मी ठिक आहे, त्रुटींची पुर्तता करतो असे सांगुन त्यांच्या कक्षातुन बाहेर जात असताना मुल्ला साहेबांनी मला थाबवुन नुसत्या त्रुटींची पूर्तता करुन काम होणार नाही तर त्यासाठी काही रक्कम पण द्यावी लागेल असे सांगुन सोमवार दि. 18/04/2022 रोजी कार्यालयात येवुन भेटण्यास सांगीतले. नविन इलेक्ट्रीकल कन्ट्रक्टर लायसेन्सच्या अनुषंगाने कोणालाही कोणतीही रक्कम द्यायची गरज नसते याबाबत माझी खात्री असुन मुल्ला साहेब सांगत असलेली रक्कम ही लाचेची असल्याबाबत माझी खात्री झाली. सहा. विद्युत निरीक्षक, मुल्ला यांनी त्यांचे कार्यालयात मला माझ्या इलेक्ट्रीकल कन्ट्रक्टर लायसेन्सचे संदर्भात बोलणे करणेकरीता व लाचेची रक्कम ठरविण्याकरीता आज रोजी बोलाविले असल्याने व माझी त्यांना कोणतीही लाच देण्याची अजिबात इच्छा नसल्याने मी नमुद सहा. विद्युत निरीक्षक, मुल्ला, विद्युत निरीक्षण कार्यालय, सोलापूर यांचेविरुध्द तक्रार देण्याकरीता दि. 18/04/2022 रोजी न्टी करप्शन ब्युरो कार्यालयात आलो व आपण त्यांचेवर योग्य ती कारवाई करावी अशी विनंती करुन श्री. उमाकांत महाडिक, पोलीस निरीक्षक यांच्या समक्ष लेखी तक्रार नोंदवली. सहा. विद्युत निरीक्षक, मुल्ला साहेब हे त्यांचे कार्यालयात केव्हा येतात याबाबत माझ्या परीचयातील इसमाकडुन माहीती घेतली असता सध्या मुल्ला साहेबांकडे सोलापूर व कोल्हापुर या दोन जिल्हयातील विद्युत निरीक्षक या पदाचा चार्ज असुन आज रोजी ते कोल्हापुर वरुन सोलापूर येथे दुपारी 03:00 वा. पर्यंत येणार असल्याबाबत माहीती मिळाली असल्याबाबत पोनि महाडिक यांना सांगीतले.मी दिलेल्या तक्रारीवर

पुढील कार्यवाही करण्यासाठी पोनि. महाडिक यांनी श्री. सचिन शाम काळे व श्री सुदर्शन गोविंद गुंडल, पद दोन्ही कृषी सहाय्यक, नेमणुक तालुका कृषी अधिकारी कार्यालय, दक्षिण सोलापूर यांना पंच म्हणून मा. तालुका कृषी अधिकारी, दक्षिण सोलापूर यांचेकडून उपलब्ध करून घेवून त्यांची पंच म्हणून काम करण्यासाठी संमती घेण्यात आली. सदर पंचाची ओळख करून घेतल्यानंतर सापळा अधिकारी पोनि महाडिक यांनी दिलेल्या सुचनेनुसार मी पुन्हा पंचांसमक्ष माझी तक्रार सविस्तर कथन केली. सापळा अधिकारी पोनि महाडिक यांनी मी त्यांच्याकडे दिलेली लेखी तक्रार दोन्ही पंचांना दाखवली. त्यावर दोन्ही पंचांनी व पोनि महाडिक यांनी वाचून सह्या केल्या. त्यानंतर पोनि महाडिक यांनी मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरवले. त्यानंतर पोनि महाडिक यांनी ते स्वत: मी, पंच क्रं. 02 गुंडल तसेच सापळा पथकातील अंमलदार असे सापळा कारवाईस आवश्यक असणा-या साहीत्यासह शासकीय मारुती सुझुकी कंपनीची अरटीका वाहन क्रं एम एच 12 युसी 4108 ने तसेच पंच क्रं. 01 काळे हे त्यांची दुचाकी वाहन हीरो कंपनीची पशन प्रो तिचा क्रं एम एच 13, बी टी 1729 वरुन विद्युत निरीक्षण कार्यालय, सोलापूर पासुन काही अंतरावर जावुन थांबण्याचे ठरविले. त्याप्रमाणे आम्ही सर्वजण न्टी करप्शन कार्यालय, सोलापूर येथुन निघुन कुमठा नाक्याचे जवळ रस्त्याच्या कडेला थांबलो. सदर ठिकाणी पोनि महाडिक यांनी अरटीगा वाहनात असलेले सापळा पथक व शासकीय चालक यांना वाहनाच्या खाली उतरवुन पंच काळे यांना वाहनामध्ये बोलावुन घेतले. सदर ठिकाणावरुन माझ्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता पोनि महाडिक यांनी सुचना दिल्या की, मी व माझ्या सोबत पंच नं 1 श्री. सचिन काळे असे पंच काळे यांचे दुचाकी वाहनावरुन विद्युत निरीक्षण कार्यालय, सोलापूर येथे जावून सहा.विद्युत निरीक्षक मुल्ला यांची भेट घेवून माझे प्रलंबित असलेल्या विद्युत ठेकेदार परवान्याच्या अनुषंगाने तसेच मुल्ला साहेबांनी दि. 12/04/2022 रोजी माझ्या कागपत्रांमध्ये काढलेल्या त्रुटींच्या पुर्ततेबाबत चर्चा करावी. सदरवेळी मुल्ला यांनी विद्युत ठेकेदार परवाना देण्याकरीता लाचेची मागणी केल्यास त्यामध्ये तडजोड करावी व सध्या पैसे आणले नसुन थोडयावेळाने आणून देत असल्याबाबत सांगावे. तसेच पंच नं.1 काळे यांना माझ्या सोबत हजर राहुन मुल्ला व माझ्यामध्ये होणारे संभाषण ऐकावे व पथक थांबलेल्या ठिकाणी परत यावे अशा सुचना दिल्या. त्यानंतर मला व दोन्ही पंचांना व्हईस रेकर्डर दाखवून त्याविषयी माहिती दिली व त्यामध्ये नवीन मेमरी कार्ड टाकण्यात आले. त्यानंतर मला व पंच 1 काळे यांना विद्युत निरीक्षण कार्यालय, सोलापूर येथे पाठविण्यासाठी माझ्या गळ्यात व्हईस रेकर्डर शर्टाचे आतील बाजूस असलेल्या बनियानचे आत अडकावून पंच काळे यांचेकडील दुचाकी वरुन 15.08 वा. चे सुमारास पाठवले. त्याप्रमाणे मी व पंच नं 1 काळे असे दुचाकी वाहनावरुन विद्युत निरीक्षण कार्यालय, सोलापूर येथे जावून सहा. विद्युत निरीक्षक मुल्ला बसतात त्या खोलीत पाहीले असता तेथे मुल्ला उपस्थित होते. परंतु त्यांच्या खोलीत इतर व्यक्ती देखील असल्यामुळे मी बाहेरच थांबलो. त्यानंतर काहीवेळाने मुल्ला यांच्या कक्षातील इतर लोक बाहेर आल्यानंतर मी त्यांच्या खोलीत जावुन नमस्कार केला असता मुल्ला यांनी मला बसण्यास सांगीतले व माझी फाईल घेवुन त्यामध्ये त्यांनी काढलेल्या त्रुटींची पुर्तता केली आहे का याबाबत खात्री केली व सदर फाईल ही मी मुंबईला पाठवणार आहे. तुम्ही तिकडे हेलपाटे घाला काय असेल ते असे म्हणाले. त्यावर मी त्यांना माझे काम करण्याबाबत विनंती केली असता मुल्ला यांनी तुम्हाला सुपरवायझर लायसन दिल तुम्ही असंच घेवुन गेलात, हे पण आता असंच घेवुन जाणार असे म्हणाले, त्यावर मी मला काही समजलं नाही असे म्हणालो, त्यावर मुल्ला यांनी सुपरवायझर चे 10 आणि हेचे 22 करा असे सांगीतले. त्यावर मी माझ्याकडे एवढे नाहीत 15 एक असतील असे सांगीतले. त्यावर मुल्ला यांनी तेवढ्यात नाही होणार असे म्हणाले . त्यावर मी त्यांना आता 15 च असुन आणुन देतो असे म्हणलो असता त्यांनी घेवुन येण्यास सांगीतले. सदरवेळी पंच काळे हे मुल्ला यांच्या कक्षाच्या दरवाज्याजवळ उभे होते. त्यानंतर मी व पंच नं. 1 काळे असे पोनि महाडिक थांबले होते त्याठिकाणी परत आलो. तेथे पोनि महाडिक यांनी माझ्या गळ्यातील व्हईस रेकडर काढून पंच नं.1 काळे व मला हकीकत विचारून घेतली. त्यामध्ये आम्ही उपरोक्तप्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर, पोनि श्री. महाडिक यांनी व पंचांनी व्हईस रेकर्डरमध्ये माझ्यात व सहा. विद्युत निरीक्षक मुल्ला यांच्यात झालेले संभाषण ऐकले. त्यामध्ये मुल्ला यांनी माझ्याकडे यापुर्वी सुपरवायझर परवानाचे केलेल्या कामाचे 10,000 /- रुपये व सध्या प्रलंबित असलेल्या ठेकेदार परवान्याचे 22,000/- रुपयांची अशी एकुण 32,000/- रु च्या लाचेची मागणी करुन त्यापैकी पहिला हप्ता 15,000/- रुपये विद्युत निरीक्षण कार्यालय, सोलापूर येथे घेवुन येण्यास सांगितले असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार सहा. विद्युत निरीक्षक मुल्ला यांच्यावर सापळा कारवाई करण्याचे अनुषंगाने पोनि महाडिक यांच्या सुचनेवरून मी विद्युत निरीक्षक मुल्ला यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्याकडे असलेले 15,000/- रूपये हजर केले. त्यात 500/- रूपये दराच्या 30 नोटा होत्या. पोनि महाडिक यांनी त्यांच्या अंमलदाराकरवी सदर नोटांचे क्रमांक को-या कागदावर लिहुन घेतले. पोनि महाडिक व दोन्ही पंचानी सदरच्या नोटांचे नंबर पडताळणी करुन त्या कागदावर सह्या केल्या. त्यानंतर सदर नोटांना थ्रासीन पावडर लावण्याची, त्याचे प्रात्यक्षीक करण्याची कार्यवाही करुन सापळा कारवाई संबंधाने करावयाच्या कामाच्या सुचना शासकीय वाहनामध्ये देण्यात आल्या. त्यानंतर दिलेल्या सुचनांप्रमाणे सहा. विद्युत निरीक्षक मुल्ला यांचेविरुध्द विद्युत निरीक्षण कार्यालय, सोलापूर येथे लाचेचा सापळा आयोजीत केला. त्याअनुषंगाने पुन्हा माझ्या गळयात शर्टाच्या आतील बनियानचे आत व्हाईस रेकर्डर अडकवुन मी व पंच नं 1 काळे असे दोघेजण पंच काळे यांच्या दुचाकी वाहनावरुन व उर्वरीत सापळा पथक आमचे पाठीमागे त्यांच्या शासकीय वाहनातुन विद्युत निरीक्षण कार्यालय, सोलापूर येथे आले व सदर परिसर सापळा लावुन थांबले. तेथे मी, पंच नं 1 काळे असे विद्युत निरीक्षक मुल्ला यांची समक्ष भेट घेण्याकरीता त्यांच्या कक्षाकडे गेलो असता ते तेथे नव्हते. त्यामुळे मी तेथे असलेल्या शिपाई यांना साहेब कोठे गेले आहेत असे विचारले असता त्यांनी साहेब बाहेर साईटवर गेले असल्याचे सांगुन काहीवेळाने येणार असल्याबाबत सांगीतले. त्यामुळे मी तेथे कार्यालयातच मुल्ला यांची वाट पाहत थांबलो. त्यानंतर सुमारे 17.40 वा च्या सुमारास विद्युत निरीक्षक मुल्ला हे कार्यालयात आले व त्यांच्या कक्षात जावुन बसले. त्यानंतर मी त्यांच्या कक्षात गेलो असता त्यांनी पैशाच्या मागणीचा हाताने इशारा करुन बोला काय म्हणताव असे म्हणाले त्यावर मी त्यांना 15 हजार आहेत असे सांगीतले. त्यावर मुल्ला यांनी पंधरात अजिबात नाही असे म्हणाले. त्यावर मी बाकीचे दोन चार दिवसात देतो असे सांगीतले. त्यावर मुल्ला यांनी उद्या मी वेळापुरला आहे असे सांगीतले. त्यावर मी राहिलेले तेथे देतो असे म्हणुन आत्ताचे देवु का असे विचारले असता मुल्ला यांनी द्या असे सांगुन उजव्या हाताने अंगुली निर्देश करुन त्यांच्या टेबलवर असलेल्या फाईल खाली ठेवण्याबाबत इशारा केला. त्याप्रमाणे मी माझ्याजवळ असलेले 15,000 रुपये काढुन त्यांनी सांगीतलेल्या फाईल खाली ठेवले. आणि त्यानंतर पुन्हा माझे कामाबद्दल बोलुन मी व पंच नं. 1 काळे असे सदर कार्यालयाच्या बाहेर येवुन नियोजीत इशारा केला.त्यावेळी सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी पंच नं. 02 गुंडल यांचेसह विद्युत निरीक्षण कार्यालय सोलापूर येथे येवुन विद्युत निरीक्षक मुल्ला यांना त्यांच्या कक्षात 17:57 वा. चे सुमारास रंगेहात पकडले. पोनि महाडिक यांचे सुचनेवरुन पंच नं. 02 गुंडल यांनी मुल्ला यांना लाचेची रक्कम 15,000 रुपये बाबत विचारले असता सदरची रक्कम त्यांच्या टेबलवरील फाईलखाली असल्याचे मुल्ला यांनी सांगीतले. सदरची रक्कम पंच नं. 02 गुंडल यांनी ताब्यात घेवुन नोटांची सापळपूर्व पंचनाम्यात नमूद केलेल्या नोटांच्या नंबरांशी पडताळणी करता ते तंतोतंत मिळून आले. त्यानंतर मुल्ला यांचेसमक्ष सदर कक्षामध्ये अंधार करुन सदर नोटा तसेच सदर नोटांवर ठेवण्यात आलेली फाईलच्या खालील भागाची अॅ.वा. दिव्याचे निळ्या प्रकाशात तपासणी करता त्या नोटांवर व फाईलच्या खालील भागावर अ.पा.ची निळसर चकाकी दिसून आली. सदरच्या नोटा व नमुद फाईल ही पुराव्याकामी पोनि महाडिक यांनी ताब्यात घेतली. तसेच दोन्ही पंच व सापळा पथकासमक्ष मुल्ला यांना त्यांचे नाव गाव याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे नाव फैजुलअली मेहबुब मुल्ला, वय 53 वर्षे, पद- सहा. विद्युत निरीक्षक, नेम - विद्युत निरीक्षण विभाग, उद्योग, उर्जा व कामगार खाते सोलापूर, सध्या रा. प्लॉट नं. 34, अंत्रोळीकर नगर, अननुर बंगला, सोलापूर असे सांगितले. त्यांना पुढील कार्यवाहीसाठी ताब्यात घेत असल्याचे मला व

दोन्ही पंचांना सांगितले. त्यानंतर मी, मुल्ला, पंच 2 गुंडल व सापळा पथक असे शासकीय वाहनाने व पंच 1 काळे त्यांच्या दुचाकी वाहनाने अॅन्टी करप्शन ब्युरो, सोलापूरच्या कार्यालयात आलो व सदरबाबत सविस्तर पडताळणी व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही अॅन्टी करप्शन ब्युरो, सोलापूरच्या कार्यालयात दि.18.04.2022 रोजी पूर्ण करण्यात आली.
तरी मला कंत्राटी पध्दतीने इलेक्ट्रीकची कामे घेण्याकरीता नविन फर्मसाठी आवश्यक असणारे विद्युत पर्यवेक्षक परवाना तसेच विद्युत ठेकेदार परवाना मिळण्याकरीता विद्युत निरीक्षण विभाग सोलापूर येथे अर्ज केला असता विद्युत पर्यवेक्षक परवाना मिळाल्यावर विद्युत ठेकेदार परवाना मिळण्याकरीता पाठपुरावा करीत असताना लोकसेवक फैजुलअली मेहबुब मुल्ला, वय 53 वर्षे, पद- सहा. विद्युत निरीक्षक, नेम - विद्युत निरीक्षण विभाग, उद्योग, उर्जा व कामगार खाते, सोलापूर यांनी माझेकडे यापुर्वी दिलेल्या विद्युत पर्यवेक्षक परवान्याचे बक्षिस म्हणुन 10,000/- रु व सध्याचे ठेकेदार परवान्याचे मंजुरीसाठी 22,000/- असे मिळुन 32,000/- रु लाचेची दि 18/04/2022 रोजी 15:08 ते 15:58 वा. चे सुमारास मागणी करुन दि 18/04/2022 रोजी 16:30 ते 17:57 वा. सुमारास विद्युत निरीक्षण विभाग, उद्योग, उर्जा व कामगार खाते सोलापूर कार्यालयातील त्यांचे स्वत:चे कक्षामध्ये स्विकारुन गुन्हेगारी स्वरुपाचे वर्तन केले आहे म्हणुन माझी फैजुलअली मेहबुब मुल्ला, पद- सहा. विद्युत निरीक्षक यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रींट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

हा जबाब दिला स.ता.म

पुढील तपास- पोनि उमाकांत महाडिक नेम लाच लुचपत प्रतिंबधक विभाग सोलापुर

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): Ajay Alaram Jagtap
**Rank** (पद): I (Inspector)
**No.**(क्र.): 14801000362AAJ **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb Impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

19/4/2022

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
विजापूर नाका पोलीस स्टेशन
सोलापूर शहर

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव)**:** Balkrushna Janardan
**Rank**(पद)**:** I (Inspector)
**No.**(सं.)**:**